महाराष्ट्रराज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
सर्व्हे क्र. ८३२ए, फायनलप्लॉट क्र. १७८ व १७९,
बी.एम.सी.सी.रोड, बालचित्रवाणीशेजारी, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे -४११००४.

Maharashtra State Board of Secon
& Higher Secondary Education, Pun
Survey No.832 A,Final Plot No.178 & 179
B.M.C.C.Road, Near Balchitravani, Bhamburd
Shivajinagar, Pune-411004.

Tel.No. 020- 25705000 Email – secretary.stateboard@gmail.com Fax No. 020-25665807

क्र.रा.मं./पापुई/ ३६८८
पुणे -४११००४
दिनांकः- १८/०६/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्रराज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषयः-इयत्ता १२वी विज्ञानप्रात्याक्षिक नोंदवहीतील प्रमाणपत्राबाबत.
संदर्भ- कोविमं/उमा./ ऑनलाईन/७५३४, दि.२२/३/२०२१ चे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, इ.१२वी विज्ञान प्रात्यक्षिक परीक्षेकरीता निर्धारित केलेल्या विज्ञान प्रात्याक्षिक नोंदवहीत, शेवटच्या पानावरील प्रमाणपत्र मजकूरात महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४११००४(Maharashtra State Bureau of Textbook Prouduction and curriculum Research, Pune-411004) असा उल्लेख करण्यात आला आहे.

परीक्षा, मूल्यमापन व गुणदान इत्यादी बाबी मंडळाशी संबंधित आहेत. त्यामुळे सदर प्रमाणपत्रावर उपरोक्त प्रमाणे उल्लेख वगळण्याबाबत संबंधीत कार्यालयास कळविलेले आहे. तुर्त सदर मजकूर खोडून त्याचा वापर करावा. आणि प्रात्यक्षिक नोंदवही मधील प्रमाणपत्रावर प्राचार्य यांनी सही करुन सदर प्रमाणपत्र प्रमाणित करावे. सदर बदल फक्त सन २०२१ च्या परीक्षेसाठीच राहील.

उपरोक्त बाबत राज्यातील, मंडळाशी संलग्न सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ट महाविद्यालयातील मुख्याध्यापकांना/ प्राचार्यांना व सर्व संबंधीतांना आपल्यामार्फत त्वरित कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

क्र.कोविमं/उ.मा.गोप./
दिनांक -१९.०७.२०२१

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविदयालये सातारा,सांगली,कोल्हापूर,
उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे इयत्ता १२ वी विज्ञानप्रात्यक्षिक नोंदवहीतील शेवटच्या पानावरील प्रमाणपत्र मजकूरात दुरूस्ती बाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर मंडळ,कोल्हापूर